**महाराष्ट्र शासन**

**विधि व न्याय विभाग**

**शासन ज्ञापन क्रमांक- मोसाअ-१२२६/प्र.क्र. १०२/का.०५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : १६ एप्रिल, २०२६

**विषय :-** सन २०२६-२७ अर्थसंकल्पीय अनुदान मागणी क्र. जे-५, मुख्य लेखाशीर्ष ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, याखालील उपशीर्ष (२०२)(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (७६१० ०४८१) मोटार वाहन खरेदी अग्रिम वाटप.

**संदर्भ :-** १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांकः अग्रिम १०१३/प्र. क्र.१०/२०१३/ विनियम, दि. २० ऑगस्ट २०१४.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-२०२२/प्र.क्र.३२/२०२२/विनियम, दि.१७/१०/२०२३.

३) विधि व न्याय विभाग, एचसीटी १२२२/१०६५/प्र.क्र.१६३(भाग-२)/कार्या.३ दि.६.२.२०२४.

४) विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र. वाहन १२२५/प्र.क्र. १७/कार्या०५, दि.२२/०९/२०२५

५) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६,

**ज्ञापन :-**

मागणी क्र. जे-५, मुख्यलेखाशीर्ष ७६१०, शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे, याखालील उपशीर्ष २०२ मोटार वाहन खरेदीसाठी अग्रीम (दत्तमत) (२०२)(००)(०१) मोटार वाहन खरेदी अग्रिमे (अनिवार्य) (७६१० ०४८१) याकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून सोबत जोडलेल्या विवरणपत्र “ब” मधील स्तंभ २ येथील नमूद अधिकारी/कर्मचारी यांना “मोटारकार” खरेदी करण्यासाठी, स्तंभ ४ येथील नमूद नियंत्रक/मंजुरी अधिकारी यांना विवरणपत्र “अ” मधील स्तंभ ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु. ७८,५०,०००/- (रुपये अठ्ठयाहत्तर लाख पंन्नास हजार फक्त) इतका निधी खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रमाणित करण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर निधी, सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार, मुंबई वित्तिय नियम, १९५९ मधील नियम १३६,१३७ व १३९ च्या अधिन राहून, तसेच, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अग्रिम-२०२२/प्र.क्र. ३२/२०२२/ विनियम, दि. १७ ऑक्टोबर २०२३ मधील सूचना व विहित नियम/अटींच्या अधीन राहून, तसेच, सदर शासन निर्णयातील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करून वितरित करण्याची दक्षता मंजुरी/नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

२) सर्व मंजुरी / नियंत्रक अधिकारी यांनी उपलेखाशीर्षनिहाय मासिक खर्चाचे नियोजन करुन अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) तरतुदीचे वाटप आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना करावे. सदर अनुदानातून केला जाणारा खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार संगणकीय अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) त्या त्या महिन्याचा खर्च त्याच महिन्यांमध्ये करण्यात यावा व तो मंजूर तरतुदींच्या मर्यादेत करण्यात यावा.

३) अर्जदार खरेदी करणार असलेल्या मोटार वाहनाची किंमत प्रमाणित अग्रिमापेक्षा कमी असल्यास शिल्लक रक्कम तात्काळ शासनास परत करावी व तसे शासनास अवगत करण्यात यावे.

४) अर्जदारास त्याच्या नांवासमोर दर्शविलेल्या रकमेइतकेच अग्रिम मंजूर करावे. निर्देशिलेल्या अर्जदाराव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही अर्जदारास हे अग्रिम देय होणार नाही.

५) संबंधित अधिकारी/कर्मचारी एखाद्या मंजुरी/नियंत्रक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून बदलून दुसरीकडे गेले असल्यास, अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर Authorisation Slip काढण्यापूर्वी, त्याबाबतचा तपशील शासनास कळविण्यात यावा. तद्नंतर त्या अनुषंगाने, BEAMS प्रणालीवर प्राधिकृत करण्यात आलेल्या रकमेमध्ये शासनाकडून आवश्यक ते बदल करण्यात आल्यानंतरच देयक तयार करण्याबाबतची पुढील कार्यवाही संबंधित कार्यालयाने करावी.

६) मोटार वाहन अग्रिम, अधिकाऱ्यांस, त्यांच्या सेवा कालावधीत एकदाच देय राहील.

७) प्रमाणित केलेल्या रकमेचा विनियोग विहित कालावधीत न झाल्यास प्रमाणित केलेली रक्कम त्वरीत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी. तसेच काही कारणास्तव सदर अग्रिम मंजूर करण्यात येत नसेल अथवा नाकारण्यात येत असेल तर, तसे या विभागास शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून १० दिवसाच्या आत कळविण्यात यावे. अन्यथा, याबाबतची संपूर्ण जबाबदारी संबधित मंजूरी/नियंत्रक अधिकारी यांची राहील.

८) प्रत्येक कार्यालयाने उद्दीष्ट निहाय केलेला, दर महिन्याचा प्रत्यक्ष खर्च हा महालेखापाल यांच्या लेख्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या खर्चाशी तंतोतंत जुळण्यासाठी http://agmaha.cag.gov.in या वेबसाईटवर दरमहा मासिक खर्चमेळाचे काम ऑनलाईन करण्यात यावे व पडताळणी केलेल्या खर्चाचे मासिक विवरणपत्र रिकंसिलीएशन कंप्लिशन स्लिपसह प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागाच्या कार्यासन २४ कडे पाठविण्यात यावे.

९) नविन मोटार कार खरेदी करण्यासाठी किंवा वित्तिय संस्थेकडून घेतलेले वाहन कर्ज परतफेड करण्यास्तव मंजूर करण्यात येणाऱ्या अग्रिमाची वसूली करताना प्रथमत: मुद्दलाची १०० समान मासिक हप्त्यात वसूली करण्यात यावी व त्यानंतर व्याजाची वसूली ४० समान मासिक हप्त्यात करण्यात यावी. मात्र, एखादा अधिकारी नियत वयोमानानुसार उपरोक्त मासिक हप्त्याचे १४० महिने पूर्ण होण्यापूर्वीच सेवानिवृत्त होणार असेल तर त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसूली होईल, अशा प्रकारे वसूलीचे हप्ते निश्चित करण्यात यावेत.

१०) अग्रिम रक्कम व व्याजाचा दर :- विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र. एचसीटी१२२२/१०६५/ प्र.क्र.१६३ (भाग-२)/का-३, दि.०६.०२.२०२४ नुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार भत्ते व तद्अनुषंगिक बाबी लागू करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील अ.क्र.५ (ऐ) नुसार न्यायिक अधिकाऱ्यांना रुपये १० लाख इतक्या मर्यादेपर्यंत वाहन कर्ज चार (४) टक्के सरळ व्याज दराने अनुज्ञेय राहील.

११) मोटार वाहन अग्रिम घेणाऱ्या न्यायिक अधिकारी यांना, कोणत्याही राष्ट्रीयकृत विमा कंपनीकडे वाहनाचा विमा उतरविण्याची मुभा राहील. तथापि, अशा विमा पॉलिसीचा कालावधी सतत वैधतेत (continuously in force) असणे आवश्यक राहील.

१२) अग्रिमासाठी अर्ज करणाऱ्या अधिकाऱ्यांची शासनाच्या सेवेतील नियुक्ती संबंधित पदाच्या सेवाभरती नियमानुसार करण्यात आलेली असावी.

१३) अग्रिम मंजूर केलेल्या कार्यालयीन आदेशाच्या प्रतीसह अर्जदाराने अग्रिम त्याच कारणासाठी वापरल्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागास ताबडतोब पाठविण्यात यावे. तसेच खरेदीखत आणि गहाणखताच्या प्रती संबंधित अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन मंजूरी प्राधिका-यांनी आपल्या कार्यालयाच्या अभिलेखामध्ये जतन करावयात. संबंधित अर्जदारास अग्रीम मंजूरीच्या वेळी याबाबत आवश्यक सुचना देण्यात याव्यात. अन्यथा, सदर प्रकरणी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अग्रीम-१०९५/ प्र.क्र.७०/ ९५/विनियम, दिनांक २६ सप्टेंबर, १९९७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

१४) सदर अधिकाऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या मोटार कार अग्रिमाबाबत त्यांच्या सेवापुस्तकात त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी. नोंद घेतलेल्या सेवापुस्तकाच्या पृष्ठाची छांयाकिंत प्रत शासनास सादर करावी.

**२.** हा खर्च "मागणी क्र.जे-५ मुख्यलेखाशीर्ष ७६१०-शासकीय कर्मचारी इ.ना कर्जे, याखालील उपशीर्ष (२०२) (००) (०१) मोटार वाहने खरेदी अग्रीमे (संकेतांक ७६१० ०४८१) यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**३.** मोटार वाहने खरेदी अग्रिमाची वसुल झालेली रक्कम “७६१० - शासकीय कर्मचा-यासाठी कर्जे इ., २०२-मोटार वाहनांच्या खरेदीसाठी आगाऊ रकमा (७६१० ५०२४) या जमाशीर्षाखाली जमा करण्यात यावी व त्यावरील व्याज ००४९ व्याजाच्या जमा रकमा ८०० इतर जमा रकमा, (०१) (४५) (ii) मोटार वाहनांच्या खरेदीसाठी आगाऊ रकमा (००४९ १७४७)” या जमाशीर्षाखाली जमा करावी.

**४.** वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम (भाग-२), दि. १७ एप्रिल २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका -१९७८, भाग पहिला, उप विभाग-१ मधील अ.क्र.१२, मुंबई वित्तिय नियम-१९५९ मधील नियम क्र.१३६, १३७ व १३९ अन्वये प्रशासनिक विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन प्रधान सचिव व (विधि परामर्शी) तथा विभाग प्रमुख यांच्या मान्यतेने प्रस्तुत शासन ज्ञापन निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** प्रस्तुत शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४१६१२१७३४८४१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAGAR JAGDISH BONDRE

Digitally signed by SAGAR JAGDISH BONDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=758E680C096816E7BC8C5CFA4D68A0A2C4BF018A47792BA2218CFC8931B AF894, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FBFC75851717C6A4821D7E342915AFB63273FFBA8DB7B62A81FFC7 8124ACD737, cn=SAGAR JAGDISH BONDRE
Date: 2026.04.16 12:20:57 +05'30'

**( सागर ज. बोंद्रे )**

**उप विधि सल्लागार-नि-उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**सहपत्र:- विवरणपत्र “अ” व “ब”**

**प्रति,**

१ प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

२ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा ) महाराष्ट्र-१ मुंबई

३ अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई

४ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा ) महाराष्ट्र-१/२ मुंबई / नागपूर

५ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती, ठाणे, सातारा, लातूर

६ जिल्हा कोषागार अधिकारी अमरावती, ठाणे, सातारा, लातूर

७ प्रमुख न्यायाधीश, कौटूंबिक न्यायालय, मुंबई

८ कार्यासन अधिकारी, (कार्यासन २३ /कार्यासन २४) विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

९ निवडनस्ती (का.५) विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

| **विवरणपत्र "अ"** | | | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| शासन ज्ञापन,विधि व न्याय विभाग, क्र. मोसाअ १२२६/प्र.क्र.१०२/का.पाच, दि. १६ एप्रिल, २०२६ सोबतचे विवरणपत्र ( रक्कम रुपयात) | | | | |
| अ. क्र. | CO / DDO code | नियंत्रक अधिकारी | प्रयोजन | मंजूर करावयाचे अग्रीम |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | J०००४ | प्रमुख न्यायाधीश, कौटूंबिक न्यायालय, मुंबई | नविन मोटार कार खरेदी | १०००००० |
| २ | J०००८ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अमरावती | नविन मोटार कार खरेदी | १०००००० |
| ३ | J००१८ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर | नविन मोटार कार खरेदी | १०००००० |
| ४ | J००२४ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा | वाहन कर्ज परतफेड | ८५०००० |
| ५ | J००२८ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे | नविन मोटार कार खरेदी /वाहन कर्ज परतफेड | ४०००००० |
| | | ( एकूण रुपये अठ्ठयाहत्तर लाख पंन्नास हजार फक्त ) | | ७८५०००० |

SAGAR JAGDISH BONDRE

Digitally signed by SAGAR JAGDISH BONDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department, 2.5.4.20=758E680C096816E7BC8C5CFA4D68A0A2C4BF018A47792BA2218CFC8931BAFB94, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FBFC75851717C6A4821D7E342915AFB63273FFBA8DB7B62A81FFC78124ACD737, cn=SAGAR JAGDISH BONDRE
Date: 2026.04.16 12:21:22 +05'30'

( सागर ज. बोंद्रे )

उप विधि सल्लागार-नि-उपसचिव, महाराष्ट्र शासन

| विवरणपत्र "ब" | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| शासन ज्ञापन, विधि व न्याय विभाग, क्र. मोसाअ १२२६/प्र.क्र.१०२/का.पाच, दि. १६ एप्रिल, २०२६ सोबतचे विवरणपत्र (रक्कम रुपयात) | | | | | | |
| अ.क्र. | अर्जदाराचे नाव | पदनाम | नियंत्रक अधिकारी /मंजूरी अधिकारी | प्रयोजन | प्रमाणित करावयाचे अग्रीम (रूपये) | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. अनंत किशोर देशमुख | २ रे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, लातूर | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| २ | श्रीमती स्वप्नाली सुजीत पाटील, | ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, ठाणे | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| ३ | श्रीमती प्रीती अशोक श्रीराम | ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर बेलापूर, नवी मुंबई | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे | वाहन कर्ज परतफेड | १०००००० | नियमानुसार |
| ४ | श्री.आकाश बाबुराव रेडकर | ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर , सातारा | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा | वाहन कर्ज परतफेड | ८५०००० | नियमानुसार |
| ५ | श्री.राहुल रावसाहेब थोरात | न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय क्र. ५, मुंबई | प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| ६ | डॉ. श्रीम. श्वेता विनय चांडक | १६ वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अमरावती | जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, अमरावती | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| ७ | श्री.आशिष ज्ञानेश्वर मारगोडे | ९ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर तथा अति.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| ८ | श्री.अवधूत अविनाश बाबर | ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बेलापूर | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे | नवीन मोटार कार खरेदी | १०००००० | नियमानुसार |
| | | | (एकूण रुपये अठ्ठ्याहत्तर लाख पंन्नास हजार फक्त) | | ७८५०००० | |

SAGAR JAGDISH BONDRE

Digitally signed by SAGAR JAGDISH BONDRE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Law and Judiciary Department,
2.5.4.20=758E680C096816E78C8C5CFA4D68A0A2C4BF018A47792BA2218CFC8931BAF894, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FBFC75851717C6A4821D7E342915AFB63273FFBA8DB7B62A81FFC78124ACD737, cn=SAGAR JAGDISH BONDRE
Date: 2026.04.16 12:21:40 +05'30'

(सागर ज. बोंद्रे)
उप विधि सल्लागार-नि-उपसचिव,
महाराष्ट्र शासन